REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# लॉरी बेकर - स्वातंत्र्य काळातील पर्यावरणप्रेमी भारतीय



**डॉ. नभा काकडे**
**सहयोगी प्राध्यापिका , सोशल महाविघालय , सोलापूर.**

## प्रस्तावना :

समाजशास्त्रज्ञ डॉ. दीपंकर गुप्ता म्हणतात की, म. गांधी व पं. नेहरु नेत्यांनी जनसमुहाच्या सहज पचनी न पडणा-या सुधारणा घडविल्या. स्वत:मागे समुहाला खेचून आणण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यात होती. हिंसक वातावरणात अहिंसेचे मूल्य रुजविणे, भारतातील महिलांना स्वांतत्र्यचळवळीत आणणे, जातिभेद दूर सारण्यासाठी झटणे, विज्ञानाची कास धरणे अशी अशक्यप्राय आव्हाने गांधी व नेहरु यांनी लीलया पेलवून दाखवली. या दोघांमुळे यापैकी कशासाठीही मानसिकदृष्ट्रया तयार नसलेल्या समाजाला त्यामुळेच आधुनिकतेच्या मार्गावर जाता आले. रामचंद्र गुहा म्हणतात, मध्ययुगात रुतलेल्या सुस्त भारताला आधुनिकतेकडे नेणा-या अनेक पिढया या नेण्याची स्वप्न पहाणारे व साकार करण्यासाठी धडपडणारे अनेक भारतीय अनेक क्षेत्रात आधुनिकता व सुसंस्कृतता या तत्वांची कास धरुन पुढे आलेले दिसतात. त्यातीलच एक कलाकार, शिल्पी व पर्यावरणप्रेमी व्यक्तीमत्व म्हणजे लॉरी बेकर होय. वास्तुशिल्पामध्ये एक इतिहास घडवून पर्यावरण वाचवले.

## लॉरी बेकर व म. गांधी -

लॉरी बेकर यांचा जन्म १९१७ मध्ये इंग्लंडमधील बर्मिगहॅम येथे झाला. १९३७ मध्ये वास्तुविशारद ही पदवी त्यांनी घेतली. याचवेळी फ्रॅंक लॉईड रार्डट यांची कॉफमन हाऊस फॉलिंग वॉटर ही वास्तु जगाचे लक्ष वेधून घेत होती. काचेच्या वापराची सुरुवातही झाली होती. १९४२ मध्ये लॉरी बेकर फ्रेंडर ॲम्ब्युलन्स युनिटच्या पथकासोबत चीनकडे निघाले, त्यावेळी दूसरे महायुध्द चालू होते. युध्दानंतर मोठया प्रमाणावर बांधकामे होणार होती. वास्तुविशारद व अभियंत्यांचा तुटवडा भासेल एवढी कामे निघण्याची चिन्हे स्पष्ट दिसत होती. इंग्लडकडे जाण्यासाठी जहाज गाठण्यापूर्वी मुंबईला थांबावे लागले त्यावेळी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. चले जाव आंदोलनाने यावेळी जोर धरलेल्या होता. बेकर व गांधीजीच्या भेटी यानंतर वारंवार होत राहिल्या. गांधीजी त्यांना म्हणाले, तुमची गरज भारतात अधिक आहे. भारतात परत येऊन कुष्ठरोग्यांच्या वसाहतींची दुरुस्ती करावी असा बेक यांच्या मनाचा कल होता. ते भारतात कायमस्वरुपी आले. पंचक्रोशीतील सामग्रीतून गरजा भागवल्या पाहिजेत हा गांधीजीचा सल्ला प्रमाण मानून स्थानिक सामग्रीचा सर्जनशील उपयोगी हे आयुष्यातील ध्येयच त्यांनी मानले.

## बेकर यांची तत्वशील कृती -

हरित इमारत हा शब्द एकविसाव्या शतकात अधिक प्रभाविपणे वापरला जाऊ लागला. परंतु या संकल्पना बेकर यांना काळाच्याही खूप आधी मांडल्या आणि अंगीकारल्या. वीट तयार करण्यासाठी कसदार माती न वापरता मातीचा खालचा थर वापरला पाहिजे अशी त्यांची कळकळ होती. आपण करु शकतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता. उर्जेचा कमीत कमी वापर व्हावा याबाबत ते सदैव काटेकोर असत. घरात दिवसा सुध्दा दिवा लावावा लागत असेल तर वास्तुविशारदाचा उपयोग काय असे ते विचारत. त्यांच्या वास्तुत पंखा लावायची गरज भासत नसते. १९७० च्या सुमारात थिरुअनंतपूरम येथील सेंटर फॉर डेव्हलपमेंट स्टडीज च्या व्यवस्थापकीय संकुलाचे बांधकाम झाले. या भव्य संकुलात संगणक आला आणि वातानुकुलतेची गरज भासली. तेव्हा बेकर यांनी नैसर्गिकरित्या हवेची झोत फिरणा-या भिंतीचे आवरण तयार केले. त्यांच्या प्रत्येक राचनेत आरंभपासूनच पावसाचे पाणी साठवणा-या हौदाची सोय केली. शक्य तिथे विविध आकारांची तळी दिली. ऊर्जा संकट बिकट होऊ असूनही आपली बिनडोक उधळमाधळ चालू आहे. ऊर्जेची बचत होऊ

शकेल अशी बांधकाम सामग्री आपण वापरत नाही. स्थानिक सामग्री उपलब्ध असूनही बेफाम वाहतूक करतो. असंख्य प्रकारचा उधहेपणा करत रहायचे आणि खर्च भागत नसल्याने जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नानेनिधीकडून अवाढय कर्ज घेतो. बदलत्या वास्ववाचे वास्तुविशारदांनाही भान नाही.

कंत्राटदार, विक्रेते, कारखाने यांचे संगनमत आणि राजकीय व्यवस्थेचा सक्रीय पाठिंबा अशा युतीमुळे शासकीय योजनेतील गृहप्रकल्प तसेच इतर बांधकामे अधिकाधिक खर्चिक करण्याचा खटाटोप चालू असतो. याची त्यांना स्पष्ट कल्पना होती. बेकर यांनी जवळपास सहा दशके अल्पखर्ची व आकर्षक घरे बांधून दाखवली. त्याचवेळी घराच्या किमती कशा कमी होऊ शकतात त्यासाठी किती व कसे पर्याय आहेत? सार्वजनिक जीवनातील इमारतींच्या किमती कमी कशा करता येतील हे पटवून देणा-या अनेक पुस्तिका त्यांनी लिहिल्या. त्यांनी १९८७ साली दारिद्रयरेषेखालील कुंटुबासाठी केवळ ९२०० रुपयात घरे निर्माण केली. १९९६ साली केरळ सरकारने गृहनिर्माण कार्यक्रमात लोकसहभाग घेण्याचे ठरवले तेव्हा कॉस्टफोर्डने कळीची भूमिका पार पाडली. बेकर यांच्या संकल्पनेनुसार प्रत्येक जिल्हयात बांधकामातील साम्रगी व घरांचे नमुने दाखवणारी निर्मिती केंद्रे तयार केली. १९८४ साली केरळचे माजी मुख्यमंत्री अच्युतानंद, अर्थतज्ञ के.एन.राज व डॉ. चंद्रदत्त यांच्यासमवेत बेकर यांनी 'कास्टफोर्ड' (सेंटर फॅार सायन्स ॲण्ड टेक्नॉलाजी फॅार रुरल डेव्हलपमेंट) या विनानफा स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. या कास्टफोर्ड ने आजपर्यत १५००० अल्पखर्ची घरांची निर्मिती केली आहे. अल्पखर्ची म्हणजे फालतू दगडविटांची घरे ही गरीबांची असे समज त्यातून दृढ होत गेले. बेकर यांनी उर्मट व भेसूर बांधकामाची खिल्ली उडवली. आणि श्रीमंतीची दर्प असलेल्या वास्तूंना मूकपणे चपराक दिली.

देशातील बदलत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीकडे ते जागरुकतेने पहात असत. ते म्हणत बहुसंख्य जनता कशी जगते हे बघण्याची आपली इच्छा नाही. आपण नियोजनकर्त्याकडे डोळेझाक करतो. वास्तुंकलेचे शिक्षण देणा-या संस्थांची संख्या दर वर्षी वाढत असली तरी पन्नास वर्षास अभ्यासक्रमात कल्पक बदल नाहीत. बदलणारी सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन ने आव्हान पेलण्याची क्षमता विघार्थ्याध्ये निर्माण करण्याचे कार्य वास्तुकलेचे शिक्षण का करीत नाही? झोपडपटटीवासीयांना उत्तम घरे कशी देता येतील, कोटयावधी लोकांना घरे रुग्णालये, शाळा बांधून देण्यासाठी काही दिशा, स्फूर्ती शिक्षणातून मिळतेच असे दिसत नाही याची त्यांना खंत वाटे.

## बेकर व पर्यावरण -

१९९४ साली शहरातील दारिद्रय, मूलभूत सेवा आणि पर्यावरण या आंतराष्ट्रीय परिसंवादाचे बीजभाषण करताना लॉरी बेकर म्हणाले होते, 'दारिद्रय हे आपल्या आयुष्याचे कडवट सत्य आहे. दारिद्रय ही संकल्पना विपुलता, समृध्दीच्या विरुध्द अर्थी एवढीच नसून दारिद्रय केवळ साधनांपुरते मर्यादित नसते. हे लोक जगातील कित्येक सुखांपासून वंचित असतात. संधी व सुविधा, माहिती व ज्ञान, अनुभव व क्षमता, प्रेम व आपुलकी यापासून ते दूर असतात. त्यांच्या दारिद्रयाला आपणच पूर्णपणे जबाबदार असतो. इमारतींसाठी भरपूर लाकूड लागते. मागणी वाढली की बेसुमार जंगलतोड होत. यामुळे आदिवासी विस्थापित होऊन भिकेला लागतात. स्वाभिमानाने जगवण्याची, उघ्योगी व स्वयंपूर्ण करण्याची निकड आपलीच असली पाहिजे.'

करण्याबददल ते म्हणत, कच-याची सुरुवात घारपासूनच होते. कचरा हे वास्तव नसून ती एक विचित्र मानसिकता आहे. मुळात टाकाऊ ही संकल्पनाच तपासली पाहिजे. काहीही विचार न करता आपण बेपर्वाइने वापर करुन प्रचंड घाण तयार केली जात आहे. समस्यांची मालिका आपणच तयार करतो. उदा. सफरचंदामध्ये भरपूर जीवनसत्वे असतात पण आपण ते टाकून देतो. आपण दर तसाला अमाप घाण करतो. ओल्या कच-यापासून उत्तम सेंद्रीय खत तयार होऊ शकते. टाकाऊ वस्तु एकत्र करुन कल्पकतेने ते वापरता येईल.

एहरी जीवनात सोयी भरपूर म्हणून ते वाटते तितके सेखकारक नसते.

१. गावापेक्षा शहरात अन्नधान्य महाग असते.
२. वर्षभर रोजगार असेलच असे नाही.
३. कंत्राटी मजुरांचे भीषण शोषण होते.
४. झोपडपटटी या तर नरकयातनाच.
५. पाणी व संडास ही भयंकर समस्या.
६. हवा, पाणी, ध्वनी प्रदूषणाचा त्रास.
७. गरीब जनतेला तर निर्वासितांचे आयुष्य.

परंतु बेकर यांच्या स्वप्नातील झोपडपटटी वेगळी आहे.

१. कुठल्याही झोपडपट्टी हटवून पुनरुत्पादक वराहत होऊ शकते.
२. झोपडपट्टी ही क्रिडांगणासारख्या आकाराचे छोटे गाव असे.
३. घराखाली दुकान, गोदाम, शाळा, रुग्णालय, वाचनालय इ. ची सोय असेल.
४. जनावरांसाठी मोठे व बायोगॅस संयंत्रे असतील.
५. झोपडपट्टी निर्मूलन करुन उत्तम वसात करावी व ती त्या झोपडपट्टी राहणा-या लोकांसाठीच असावी.

अशा या बेकर नावाच्या पर्यावरणप्रेमी माणसाने निसर्ग वाचवून माणसपण जपण्याच्या अनेक संकल्पना मांडल्या. स्वातंत्र्योत्तर काळात याचा वापर करण्यास देश कमी पडला हेच खरे.

## संदर्भसूची :


- लॉरी बेकर - अतुल देऊळगावकर
- रुरल हाऊस प्लॅन्स - लॉरी बेकर
- इंदिरा आवास योजना गाईडलाईन्स - लॉरी बेकर
- ब्रिकवर्क - लॉरी बेकर
- हाऊ टू रिडयुस बिल्डिंग कॉस्टस - लॉरी बेकर


LBP PUBLICATION